## ५२. मर्मबिंदूंचे वर्णन आणि उपयोग :
(ॲक्युप्रेशर)

| मर्मबिंदू | बिंदूवर्णन | उपयोग |
|---|---|---|
| सीव्ही २२ | गळ्याच्या पुढच्या खळग्यात, मध्यरेषेवर | खोकला, दमा, घसासूज, आवाज बसणे, उचकी |
| डिंगचुआन | मानेच्या खालचा भाग, पाठीमागे, ७ व्या मानमणक्याच्या अर्धा इंच बाजूला – दोन्हीकडे | दमा, खोकला, मान आखडणे, खांद्यात वेदना, पाठदुखी |
| पित्ताशय १४ (जीबी) | कपाळावर – भुवईच्या १ इंच वर मधोमध | डोकेदुखी (पुढचा भाग), डोळ्याला अंधुक दिसणे |
| जीबी २० | मानेचा वरचा भाग (मान आणि डोके यांची जुळणी असते तिथे) दोन्ही बाजूला – खळग्यात | डोकेदुखी, मान आखडणे, गरगरणे, डोळा दुखणे, खांदे दुखी |
| जीबी २१ | जीबी २० कडून खांद्यांच्या उंचवट्याकडे उतरताना मधोमध, स्नायूरेषेवर | खांदेदुखी, मान दुखणे, मान आखडणे |
| जीबी ३० | खुब्याच्या हाडाखाली, पँटच्या बाजूच्या खिशात हात घालतो ती जागा | कंबरदुखी, खुबा दुखणे |
| जीबी ३४ | गुडघ्याच्या बाहेरच्या बाजूस, खालच्या टेंगळाच्या १' वरती | पाय बधिरणे, पायाची शक्ती कमी होणे, गुडघा सुजणे, तोंड कडू होणे,उलटी |
| जीव्ही २६ | नाकाच्या खाली, मिशीच्या मध्यभागी | बेशुद्धी व लहान मुले/ बाळे यांना झटके येणे |
| जीव्ही १४ | मानेच्या तळाशी, मध्यरेषेवर | थंडीताप, सर्दी, दमा, खोकला, मान आखडणे |
| जीव्ही २० | डोक्याच्या वरच्या मध्यबिंदूवर कर्णरेषेच्या मधोमध | डोकेदुखी, कानात गुणगुण, डोळ्यांना अंधुक दिसणे |
| हृदय ९ | करंगळीच्या आतल्या बाजूस, नखाच्या तळरेषेत | छातीत धडधड, छातीत दुखणे, |
| हृदयरेषा | मनगटावर, आतल्या बाजूस | छातीत धडधड, अधीरता, छातीत दुखणे, निद्रानाश, बेशुद्धी फिट– भिरगी, हाताचे टळवे गरम होणे |
| मूत्रपिंड १ | पायाच्या तळव्यावर, लहान बोटाच्या व अंगठ्याच्या फुगाराच्या मधे | घसासूज, लघवीस वेदना, बेशुद्धी, अवघड बाळंतपण |
| मूत्रपिंड २७ | गळपट्टीच्या हाडाखाली, छातीच्या मध्यरेषेच्या २ इंच बाजूला | दमा, खोकला |
| मूत्रपिंड ३ | टाचेच्या आतल्या बाजूला, मागल्या स्नायूबंधाच्या १.५ इंच पुढे | घसासूज, अनियमित पळी, खालची पाठदुखी |
| मोठे आतडे ११ | हाताच्या कोपराच्या बाहेरची बाजू, जेथे घडी रेषा संपते तिथे | हाताच्या कोपराचे दुखणे, कोठेही खाज, अतिरक्तदाब, पोटदुखी, ताप |
| मोठे आतडे २० | नाकपुडीच्या बाजूला अर्धा इंच | नाक चोंदणे, नाकातून पाणी, घोळणा फुटणे |
| मोठे आतडे ४ | मनगटापासून ३ सें.मी खाली, अंगठा व तर्जनी यांच्या मुळांच्या मधोमध, इथे नाडी लागते (पाऊल नाडी) | गर्भाशयातून रक्तस्राव, हर्निया (अंतर्गळ), फिट– भिरगी, डोकेदुखी, निद्रानाश |
| यकृत ८ | गुडघा वाकवा (खुर्चीवर बसल्यावर वाकतो तसा), आतल्या बाजूला त्वचेची घडी संपते तो बिंदू | लघवीस वेदना, ओटीपोट दुखणे,गुडघ्यात वेदना, मांडीच्या आतल्या बाजूस दुखणे |

| मर्मबिंदू | बिंदूवर्णन | उपयोग |
|---|---|---|
| फुप्फुस १ | गळपट्टीच्या मध्यबिंदूच्या १ इंच खाली | खोकला, दमा, घसासूज, हात किंवा हाताचा कोपरा दुखणे. |
| फुप्फुस ६ | मनगट व हाताचा कोपरा यांच्या गोऱ्या बाजूला मधोमध, किंचित बाहेरच्या बाजूला | खोकला, दमा, घसासूज, हात किंवा हाताचा कोपरा दुखणे. |
| फुप्फुस ७ | मनगटाच्या सुमारे दीड इंच वर, वरील रेषेवरच | दमा, खोकला, मान आखडणे, घसासूज, मनगट अधू होणे. |
| हृदयआवरण ६ | मनगटाच्या चेषेच्या वर, मध्यरेषेवर गोऱ्या बाजूवर, २ इंच वर | छातीत धडधड, उलटी, मलेरिया–ताप, फिट–भिरगी, हाताच्या कोपरा दुखणे |
| लहान आतडे ३ | मूठ आवळल्यानंतर करंगळीच्या बाजूच्या पहिल्या हस्तरेषेची घडी संपते तो बिंदू | डोकेदुखी, मान आखडणे, ताप |
| पांथरी १० | मांडीच्या आतल्या बाजूला गुडघारेषेच्या ३ इंच वर | मासिक पाळीचा त्रास, मांडीच्या आतल्या बाजूची वेदना, इसब, खाज |
| पांथरी ६ | पायाच्या आतल्या घोट्याच्या वर ३ इंचावरचा बिंदू | मासिक पाळीचा त्रास, लघवीस वेदना गॅस–गुबाऱ्यामुळे त्रास, पायांमध्ये वेदना किंवा लुळेपणा |
| पांथरी ९ | पोटरीची आतली बाजू | लघवीस वेदना,सूज, जुलाब–अतिसार |
| जठर २५ | बेंबीच्या बाजूस २ इंच अंतरावर | पोटदुखी, गॅसेस, जुलाब, बद्धकोष्ठ |
| जठर ३६ | गुडघ्याच्या वाटीच्या खाली ३ इंच, पायाच्या दोन हाडांच्या वरच्या टोकांच्या दरम्यान | पोटदुखी, अपचन, जुलाब, गुडघा किंवा पाय दुखणे, बद्धकोष्ठ |
| जठर ४४ | पावलाच्या दुसऱ्या व तिसऱ्या बोटांच्या मुळांच्या दरम्यान | दातदुखी, पोटदुखी, जुलाब, ताप, पावलाचा बाहेरचा भाग सुजणे, दुखणे |
| जठर ७ | कानशिलाच्या हाडाच्या खाली, कानासमोर १ इंचावर | वरच्या जबड्यातील दातदुखी, कानात गुणगुण, बहिरेपणा (बधिरपणा) |
| तैयांग | भुवईच्या बाहेरच्या टोकाच्या बाजूला १ इंच | नेत्रविकार – फडफडणे, लाली, सूज, वेदना |
| तिहेरी ऊब १७ | कानाच्या पाळीच्या मागे–खाली म्हणजे जबड्याचा कोपरा व कानामागचे टेंगूळ यांच्या दरम्यान | कानात आवाज, बधिरत्त्व, गाल सुजणे, चेहऱ्याचा लुळेपणा (पॅरालिसिस) |
| तिहेरी ऊब ५ | मनगटाच्या मागच्या बाजूस सुमारे २ इंच वरती, मध्यभाग | डोकेदुखी, ऐकू कमी येणे, कानात आवाज, हाताचे कोपर दुखणे, बोटे दुखणे, हातांची थरथर |
| मूत्राशय ३७ | नितंब आणि गुडघा यांच्या दरम्यान मांडीच्या मागच्या बाजूच्या मधोमध | कंबरदुखी, पोटरीदुखी |
| मूत्राशय ५७ | पोटरीच्या फुगाराच्या लगोलग खाली | कंबरदुखी, पोटरीदुखी |
| मूत्राशय ६० | बाहेरच्या घोट्याच्या व पायामागच्या स्नायूबंधाच्या दरम्यान | डोकेदुखी, मान ताठरणे, पाठदुखी |
| जठर ६ | खालच्या जबड्याच्या मागील कोनावर | वरच्या जबड्याची दातदुखी, कानात गुणगुण, बहिरेपणा |
| यिंटांग १ | दोन भुवयांच्या दरम्यान मधोमध | पुढची डोकेदुखी, बाळाचे झटके, नाक वाहणे |

| मर्मबिंदू | बिंदूवर्णन | उपयोग |
|---|---|---|
| **दैवीशांतता** | पोटरीच्या बाजूला, गुडघ्याच्या मध्यरेषेपासून ३ इंच खाली | चिंता–तणाव–अधीरपणा यावर |
| **आनमिन** | करंगळीच्या बाजूला, शेवटचे पेरे | भूक वाढण्यासाठी |
| **सिबाई** | डोळ्याखाली, जिथे नाकाकडून येणारी रेषा थांबते | सर्दी |
| **तूशिओ** | बेंबीखाली २ इंचावर | बद्धकोष्ठ |
| | कानाच्या समोर पण वर, कानासमोरची केसांचे कल्ले असतात तिथे | कानदुखी, डोकेदुखी |
| **नेत्रबिंदू १ ते ६** | भुवईच्या रेषेवर तसेच अंतिम बिंदूच्या मागे व खाली | डोळे दुखणे, पापणी लवत राहणे. |
| **काटे** | कंबरेत मागे, मध्यरेषेपासून ३ इंच बाजूला, हाडाची कड उंचावते तिथे | मणक्याची पाठदुखी |
| **जेनमाई** | हनुवटीच्या मध्यबिंदूवर | मासिक पाळी थांबताना होणारा त्रास |
| **सीव्ही** | कपाळाचा उभा–आडवा मध्यबिंदू | मासिक पाळीचा त्रास |
| **तिहेरी ऊब** | करंगळी आणि शेजारचे अंगठीचे बोट याच्या बेचक्यात | दीर्घदुखी, सांधेदुखीचा विकार |
| **ली सी म्यू** | पिंडरीच्या आतल्या बाजूला गुडघा–घोटा यांच्या दरम्यान मधोमध, नडगीच्या थोडे मागे | पुरुषांची लैंगिक दुर्बलता |
| **क्लिबे** | मांडीच्या आतल्या बाजूस मध्यबिंदूवर | स्त्री–पुरुषांची लैंगिक दुर्बलता |